**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**क्र. रामाआ नागपूर/तक्रार क्रमांक: ४६६/२०२३/नागपूर**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी |
| श्री. चंद्रभान ढोंडोपंत कोलते, मु. पो. खापरखेडा, वार्ड नं. ३, ता. सावनेर, जि. नागपूर-४४११०२ | जिल्हा क्रिडा अधिकारी, चंद्रपूर | उपसंचालक, क्रिडा व युवकसेवा, नागपूरविभाग, नागपूर |

**सुनावणी दिनांक १३.११.२०२४**

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार दिनांक १३.१२.२०२३ रोजीच्या अर्जान्वये आयोगाकडे थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यानुषंगाने सदर तक्रारीवर आज दिनांक १३.११.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रिडा अधिकारी, चंद्रपूर, श्री. अविनाश पुंड व सहायक जन माहिती अधिकारी, श्री. मनोज पंधराम उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार द्वितीय अपील दाखल न करता जोडपत्र-अ नुसार मागितलेली माहिती अप्राप्त/प्रथम अपीलीय आदेश असूनही माहिती दिली नाही, असे कारण नमुद करुन कलम १८(१) नुसार थेट तक्रार दाखल केली आहे.

तक्रारकर्ता यांनी उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, नागपूर या कार्यालयाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक २०.०७.२०२३ रोजी माहिती अर्ज सादर करुन त्यामध्ये "क्रीडा उपसंचालक कार्यालय, विभागीय क्रीडा संकुल, नागपूर विभागाच्याअंतर्गत सर्वच जिल्हयातील तालुका क्रीडा संकुल येथे सन २००१ ते २०२३ पर्यंत नियुक्त/कार्यरत असलेले क्रीडा मार्गदर्शक यांचे नावे, वय,संपूर्ण पत्ता, नियुक्ती तारीख, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता व पात्रता, आजपर्यंत देण्यात आलेले मानधन, नियुक्ती विषयी अर्जाचा प्रस्ताव, प्रस्ताव मंजूर अहवाल, नियुक्ती आदेश, प्रशिक्षणार्थी खेळाडूंची संख्या व हजेरीपट, कार्याचा अहवाल, वर्तमान अन्य व्यवसाय किंवा नोकरी, क्रीडामार्गदर्शक विषयी वृत्तपत्रातील जाहिरातीचे कात्रण, इत्यादीच्या प्रती माहितीचा अधिकार लोगो सहित साक्षांकित करुन मिळण्याबाबत" असे नमुद करुन माहिती मागितलेली आहे.

त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती विभागातील जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संबंधीत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(३)(२) नुसार सदर अर्ज जिल्हा

क्रीडा अधिकारी, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली यांच्याकडे दिनांक ०७.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये वर्ग केला आहे. परंतु सदर माहिती त्यांच्याकडून अप्राप्त आहे.

अपीलार्थी यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०.१०.२०२३ रोजी जोडपत्र- ब सादर करुन संबंधीत जिल्हा क्रीडा अधिकारी, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली यांनी अद्यापही माहिती न पुरविल्याने प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. सदर प्रथम अपील अर्जावर दिनांक ०८.११.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून पुढीलप्रमाणे आदेश पारीत केले आहे.

"जिल्हा क्रिडा अधिकारी तथा जन माहिती अधिकारी, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली यांनी अपीलार्थी यांनी मागणी केलेली परिपूर्ण माहिती दिनांक ३०.११.२०२३ पर्यंत उपलब्ध करुन द्यावी, असे आदेशीत करुन अपील निकाली काढले आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता यांनी, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेश असूनही माहिती दिली नाही. जन महिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) नुसार दंड व कलम २०(२) नुसार शास्तीची कार्यवाही करावी. तसेच माहिती प्राप्त करण्यासाठी झालेल्या आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासापोटी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(८)(ख) नुसार रु. ५,०००/- ची नुकसान भरपाई देण्यात यावी. भारतीय दंड संहिता १८६० कलम १६६ ए, १८८ व २१७ नुसार कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे. त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ६ जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाशी संबंधीत आहे. तसेच सदर माहिती ही विस्तृत व व्यापक स्वरुपाची आहे.

सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये आयोगाकडे द्वितीय अपील दाखल न करता दिनांक १३.१२.२०२३ रोजी थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. तक्रारकर्ता यांनी जोडपत्र-अ ची प्रत जोडलेली नसल्याने त्यांचा तक्रार अर्ज ग्राहय धरता येत नाही. माहितीचा कालावधी उपलब्ध कागदपत्रांवरुन सन २००१ ते २०२३ असा नमुद केलेला आहे. सदर कालावधी सुरु होण्याचा व समाप्त होण्याचा उल्लेख नाही. त्यामुळे तक्रारकर्ता यांची विनंती मोघम होत आहे. तक्रारकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यापक व विस्तृत स्वरुपाची असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम (७)९ नुसार मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने व्यापक मनुष्यबळ व साधन सामग्री मोठया प्रमाणात वळवीने शक्य होणार नाही. तसेच सदर थेट तक्रारीमध्ये माहिती देण्याचे आदेश खालील आदेशामुळे पारीत करता येत नाहीत.

**In the case of Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the said Act has no jurisdication to pass an order providing for access to information**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

उपरोक्त मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार तक्रारीमध्ये माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही. तसेच तक्रारकर्ता यांना नुकसान भरपाई देखील देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे प्रस्तुत तक्रार अर्ज पुढील चौकशी योग्य नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

ठिकाण : नागपूर
दिनांक: १३.११.२०२४

जा.क्र. 9011 दि. 31 DEC 2024

E:\तक्रार क्र. 466-2023-कोलते